# सांगोला शौर्य

संपादक –वैभव हरिदास काटे मो.९७६६७७६२६०


# कटफळ येथे वृक्षारोपण व जलतारा योजनेचे भूमिपूजन


**सा.सांगोला शौर्य न्यूज**


कटफळ (ता.सांगोला) येथे मा.पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मिशन विकसित गाव अंतर्गत आज दि. ०२ रोजी वृक्षारोपण व जलसंधारणामधील जलतारा या प्रकल्पाचे भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर वृक्षारोपण सांगोला पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक विनोद घुगे,पंचायत समिती सांगोला चे गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, विस्तार अधिकारी श्री.पुकळे, फिनोलेक्स कंपनी व मुकुल माधव फाउंडेशन चे समन्वयक श्री संतोष शेलार सर यांचे हस्ते करण्यात आले.



**महूद :**कटफळ (ता.सांगोला) येथे वृक्षारोपण व जलसंधारणामधील जलतारा या प्रकल्पाचे भूमिपूजन करताना पोलीस निरीक्षक विनोद घुगे,गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी,विस्तार अधिकारी श्री.पुकळे, फिनोलेक्स कंपनी व मुकुल माधव फाउंडेशन चे समन्वयक श्री संतोष शेलार,दत्ता खरात आदी मान्यवर **फोटो छाया –बिरा हाके**

निसर्ग मानवाला खूप काही देत असतो याची जाण ठेवून, निसर्गाचं देणं आहे.या कृतज्ञतेच्या भावनेतून प्रत्येक नागरिकाने पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी आपापल्या क्षेत्रात वृक्षारोपण करून किमान एक तरी झाड लावले पाहिजे.वृक्ष लागवड ही एक व्यापक चळवळ झाली असून, जगा, जगवा अन् जगू दया हा जीवन मंत्र आत्मसात करुन वृक्षारोपण मोहिमेत सामाजिक बांधिलकीतून सहभागी व्हावे.यासाठी श्री पांडुरंग विद्यालय कटफळ, जिल्हा परिषद शाळा कटफळ यांच्या विद्यार्थ्यांनी गावामधून वृक्षदिंडी काढून लोकजागृती जागृती केली.

यावेळी सदर वृक्षारोपणासाठी इंडेक्स कंपनी व मुकुल माधव फाउंडेशन यांच्याकडून दोनशे विविध प्रकारची दहा फूट उंचीची रोपे देण्यात आली. सदर वृक्षांची लागवड कटफळ येथील विविध परिसरांमध्ये ग्रामस्थांकडून लावण्यात लावण्यात आले.सदर कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत कटफळ जय हिंद क्रिकेट क्लब कटफळ यांच्याकडून करण्यात आले.यावेळी कटफळ येथील सरपंच,उपसरपंच,ग्रामस्थ आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.